दैनिक अन्यायाचा प्रतिकार महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

● वर्ष १६ वे ● अंक १५८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१ सप्टेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# यंदाही दहिहंडी उत्सवावर कोरानाचे सावट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गतवर्षीप्रमाणे यंदाही दहीहंडी उत्सवाला प्रशासनाने परवानगी नाकारल्याने कोणत्याही मंडळाने गर्दी जमवून दहीहंडी उत्सव साजरा न करता साधेपणाने उत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले होते. या अनुषंगाने पनवेलमध्ये साध्या पद्धतीने घरगुती स्वरूपात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. कोरोनामुळे गतवर्षीप्रमाणे यंदाही सार्वजनिक मंडळाच्या हंड्या रद्द करण्यात आल्या होत्या. त्यामुळे बाळगोपाळ व तरुणांमध्ये हिरमोड दिसून आला. दरवर्षी गोविंदाच्या उत्साहात फुललेले रस्ते, चौक, मैदाने मात्र यावर्षीही सुने पडल्याचे चित्र पाहायला मिळाले.

पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी आदी परिसरातील सार्वजनिक, खाजगी मंडळे व राजकीय पक्षाच्या दहीहंड्या रद्द झाल्यामुळे दहीहंडी पथकातील गोविंदांनी घरीच राहणे पसंत केले. पनवेल शहरातील कोरोनाचा संसर्ग वाढू नये यासाठी पोलिसांनी शहरातील प्रमुख दहीहंडी उत्सव मंडळांना दहीहंडी उत्सव साजरा न करण्याचे आवाहन केले होते. तसेच गतवर्षीप्रमाणे गर्दी न करता उत्सव साधेपणाने करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला सर्व दहीहंडी मंडळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून सोसायटीच्या आवारात तसेच घरगुती



## प्रशासनाच्या आवाहनाला दहीहंडी उत्सव मंडळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



स्वरूपात दहीकाला उत्सव साजरा करण्यात आला.

नाथ संप्रदायातील मंडळींनी शासनाचे सर्व नियम, निर्बंध व सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून पारंपारिक प्रथेप्रमाणे दहीकाला उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी अत्यंत कमी उंचीवर बांधलेल्या 'देवांच्या हंड्या' कोणतेही थर न रचता हाताने व काठीच्या साहाय्याने फोडण्यात आल्या. कोणताही गाजावाजा अथवा ढोल ताशांच्या गजराविना अत्यंत साधेपणात व घरगुती पद्धतीने पनवेलमध्ये दहीकाल्याचा धार्मिक सण साजरा करण्यात आला. त्यातच मंगळवारी (दि.३१ ऑगस्ट) पनवेल शहरात दिवसभर पावसाची संततधार सुरू होती. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील २-३ दिवस पावसाचा अंदाज वर्तवल्याने नागरिकांनीही घरीच राहणे पसंत केले. शहरात निर्बंधांचे उल्लंघन होऊ नये व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दिवसभरात पोलीस प्रशासन देखील सज्ज होते.

दरवर्षी सार्वजनिक दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात येते. ठिकठिकाणाहून अनेक गोविंदा पथके हंडी फोडण्यासाठी येत असतात. परंतु गेल्यावर्षीपासून कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने यंदाही साईतेज प्रतिष्ठानतर्फे दहीहंडी उत्सव रद्द करण्यात आला आहे. कोरोनाचा प्रसार वाढू नये हेच यामागील मुख्य उद्दिष्ट आहे. सर्व गोविंदांनी सुरक्षित राहावे, काळजी घ्यावी. कोरोनाचे संकट पूर्णपणे दूर व्हावे आणि पूर्वीप्रमाणे सण उत्सव उत्साहात साजरे करता यावेत हीच प्रार्थना.

**- नगरसेवक तेजस कांडपीळे (साईतेज प्रतिष्ठान दहीहंडी उत्सव आयोजक)**

## संक्षिप्त...

### आरेत बिबट्याच्या हल्ल्यात महिला जखमी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गोरेगाव पूर्व, आरे कॉलनी, प्रभाग ५२, युनिट ३१ मधील रहिवासी लक्ष्मी उंबरसडे ही आदिवासी महिला काल रात्री ९.३०च्या सुमारास घरी परत येत असताना तीच्यवर बिबट्याने हल्ला केला. या हल्लयात सदर महिला जखमी झाली.

गेले काही महिने दिंडोशी न्यू म्हाडा कॉलनी,आरे येथे बिबटया येत आहे. तर गेल्या सोमवारी पहाटे ओबेरॉय मॉल समोरील शिवधाम संकुल परिसरात बिबटया आला होता. तर काल रात्री बिबट्याने लक्ष्मी उंबरसडे या महिलेवर हल्ला केला.

येथील परिसरात बिबटयाचा होणारा वावर लक्षात घेता वन विभागाने येथे।पिंजरा लावून या बिबट्याला जेरबद।करावे अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

या हल्लयाची माहिती मिळाल्यानंतर प्रभाग ५२ च्या भाजपा नगरसेविका प्रीती सातम या घटना स्थळी जाऊन त्यांनी सदर महिला व तिच्या कुटुंबीयांची भेट घेतली, तसेच त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला व रात्री प्रवास करताना नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन केले. याठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करण्याच्या संदर्भात अधिकाऱ्यांची सुद्धा बोलणी केली असून लवकरच त्या संदर्भात कार्यवाही होईल अशी माहिती त्यांनी दिली.

# मंदिरं उघडली गेलीच पाहिजेत, नाहीतर घंटानाद करू : राज ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील मंदिरं उघडण्याची मागणी करत भारतीय जनता पक्षानं काल राज्यभरात शंखनाद आंदोलन केल्यानंतर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनाही मंदिरांसाठी मैदानात उतरण्याच्या तयारीत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज तसे स्पष्ट संकेत दिले.

दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. करोना संसर्ग फैलावू नये म्हणून दहीहंडी साजरी करण्यास राज्य सरकारनं मनाई केली होती. मात्र, हे मनाई आदेश झुगारून मनसेच्या कार्यकर्त्यांनी मुंबई, ठाण्यात दहीहंडी फोडली. पोलिसांनी अनेक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. या सगळ्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला. 'राज्यात सगळं काही सुरळीत सुरू आहे. यात्रा निघाताहेत, मेळावे होताहेत. बिल्डर



कामं करून घेण्यासाठी सरकारच्या लोकांना भेटताहेत. त्यातून करोना पसरत नाही, पण सण-उत्सव आले की करोना पसरतो. हे सगळं जाणीवपूर्वक केलं जात आहे. सगळे सण साजरे झालेच पाहिजेत. सरकारला नियम लावायचेच असतील तर सगळ्यांसाठी एकच नियम लावावा. एकाला एक नियम आणि दुसऱ्याला एक नियम असं चालणार नाही,'

.../४

# कारची ट्रकला जोरदार धडक ; एकाचा जागीच मृत्यू

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण-खोपोली बायपास रस्त्यावर गणपतीवाडी नजीक स्वतःवरील नियंत्रण सुटलेल्या कार चालकाने समोरून येणाऱ्या ट्रकला जोरदार धडक दिल्याने एका स्थानिकाचा जागीच मृत्यु झाला. गावकऱ्यांनी रस्ता रोको केल्याने काहीकाळ तणाव पूर्ण वातावरण होते.

पेण-खोपोली बायपास रोडचे काम गेले २ वर्ष संथ गतीने सुरु आहे. वर्षभर अर्धवट स्थितीत असलेल्या गणपती वाडी येथील चढणीवर अनेक ठिकाणी मोठे मोठे दगडी पडली आहेत. तसेच पावसामुळे रस्ताही खचला आहे. अनेकदा या गावातील नागरिकांनी सदरील कामाच्या बाबत अधिकारी व ठेकेदाराशी संपर्कही केलेला होता. मात्र ठेकेदाराकडून नेहमीच दुर्लक्ष केले गेले. आज याच ठिकाणी पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या ईवॉन कार क्र.एमएच ०६ बीई



३२४२ वरील चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने खोपोलीच्या दिशेने येणाऱ्या हटकेश्वर कंपनीचा ट्रक क्रमांक एमएच १२ आरएन २३९३ याला जोरदार धड़क दिल्याने गणपतीवाडी येथील कारचालक सुरेश कदम याचा जागीच मृत्यु झाला.

अपघात झाल्याचे समजताच गावकऱ्यांनी काही तास रस्ता बंद करून ठेवला होता. पोलिस आणि गावकरी यांच्यात शाब्दिक बाचाबाची ही झाली. ठेकेदार आणि इंजिनीयर याला आत्ता इथे बोलावून मयत इसमाच्या नातेवाइकांना आर्थिक मदत करण्याची आणि रस्त्याचे काम लवकरात लवकर मार्गी लावन्याची मागणी यावेळी गावकऱ्यांनी पेणचे नवनिर्वाचित पोलिस निरीक्षक जितेंद्र पोळ यांच्याकडे केली. सदर अपघाताची नोंद पेण पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पुढच्या २४ तासात मुसळधार पावसाची शक्यता ; हवामान खात्याचा इशारा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दडी मारलेल्या पावसाने आता पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. राज्यात पुढच्या दोन ते तीन दिवसात मुसळधार पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. इतकंच नाही तर येत्या २४ तासांतही मुसळधार पाऊस होईल असा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. राज्यातल्या अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या मुसळधार पाऊस सुरू असून अनेक ठिकाणी पूरजन्य परिस्थिती ओढावली आहे.



हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, पालघर, ठाणे, नवी मुंबई, मुंबई, रायगड, नंदूरबार, धुळे, जळगाव, नाशिक इथे येत्या २४ तासात मुसळधार ते अती मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आज पालघर नाशिकमध्ये तीव्र मुसळधारचा इशारा खचऊने दिला आहे. तर उद्या पावसाचा जोर जरी कमी असला तरी नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

मुंबई-ठाणे उत्तर कोकणातसुद्धा पाऊस असेल असं हवामान खात्याकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, गेल्या तीन ते चार दिवसांपासून राज्यात पावसाची रिमझिम सुरू आहे. पण आता हा जोर वाढेल असं हवामान खात्याचे म्हणणे आहे. सध्या बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार

.../४

# पनवेल महापालिकेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दिले आयुक्तांना निवेदन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

ठाणे महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती कल्पिता पिंपळे यांच्यावर अनधिकृत हातगाड्यांवर कारवाई करत असताना अमरजीत यादव या फेरीवाल्याने तीक्ष्ण हत्याराने हल्ला केला, या हल्लयामध्ये त्या गंभीर जखमी झाल्या या हल्लयाच्या निषेधार्थ आणि हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावतीने आयुक्त गणेश देशमुख यांना निवेदन देण्यात आले.

दिनांक ३० ऑगस्टला ठाणे महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंपळे या अतिक्रमण विरोधी पथक घेऊन अनधिकृत हातगाड्यांवर कारवाई करत असताना तेथील गुन्हेगारी प्रवृत्तीचा फेरीवाला अमरजीत यादव याने श्रीमती पिंपळे व त्यांचा अंगरक्षक सोमनाथ पालवे यांच्यावर तीक्ष्ण हत्याराने जीवघेणा हल्ला केला. यामध्ये दोघांनाही गंभीर दुखापत झाली. या गंभीर कृत्याचा निषेध करण्यासाठी तसेच या घटनेतील गुन्हेगारांवर तात्काळ खटला चालवून, गुन्हेगाराला कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आयुक्त तसेच महाराष्ट्र राज्य मुख्याधिकारी संघटना मुंबईचे अध्यक्ष गणेश देशमुख यांना निवेदन दिले.

गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक जेव्हा कर्तव्य बजावत असताना अधिकाऱ्यांवर हल्ले करतात,तेव्हा अशा प्रकारच्या भ्याड हल्लयाने केवळ हल्ला झालेला अधिकारीच नव्हे तर संपूर्ण प्रशासनाचे मनोधैर्य खच्ची होते. त्यामुळे अशा प्रकारच्या हल्लया विरोधात संघटित निषेध करण्यासाठी आज अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून काम बंद आंदोलन केले.

याप्रसंगी उपायुक्त विठ्ठल डाके, सचिन पवार सहाय्यक आयुक्त धैर्यशील जाधव आणि मनपा कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी अनिल जाधव, शैलेश गायकवाड, सुनिल मानकामे आणि मोठ्या संख्येने महिला कर्मचारी ही उपस्थित होत्या.

# जेएनपीटीचे खासगीकरण होऊ देणार नाही : महेंद्र घरत

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी प्रशासनाने येथील प्रकल्पग्रस्तांच्या समस्या गेली अनेक वर्षे प्रलंबित ठेवण्याचे काम केले आहे. त्याकडे दुर्लक्ष करून जेएनपीटीचे खासगीकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे हा कुटील डाव आम्ही कदापी यशस्वी होऊ देणार नाही असा इशारा कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जेएनपीटी बंदर खासगीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत लोकप्रतिनिधी व राजकीय नेत्यांबरोबर जेएनपीटी चेअरमन संजय सेठी व डेप्युटी चेअरमन उमेश वाघ यांनी संवाद साधला. यावेळी जेएनपीटी बंदर तोट्यात जात असल्याचा अहवाल



त्यांनी सादर केला.

यावेळी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष कामगार नेते महेंद्र घरत, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, मनसे जिल्हाध्यक्ष अतुल भगत, कामगार नेते पी. के. रामण यांनी समस्यांचा पाढा वाचत या खासगीकरणाला कडाडून विरोध केला. जेएनपीटी प्रशासनाने साडेबारा टक्के भूखंडाचे वाटप आजही प्रलंबित आहे. तसेच इतर अनेक समस्यां सोडविण्याचे आश्वासन दिले मात्र ते काही आजही प्रलंबित आहेत. विशेष म्हणजे सीआरएस फंडचा वापर तालुक्याला न करता इतर ठिकाणी वारेमाप खर्च करणे, हनुमान कोळीवाडा गावचे पुनर्वसन व पीएसी बंदरामुळे पाणजे गाव पाण्याखाली जाणार त्यांचे आधी योग्य ते पूर्वसन करण्यात यावे. यावेळी चेअरमन संजय सेठी यांनी शासनाला तुमच्या भावना कळवू असे सांगितले.

जेएनपीटी प्रशासन प्रकल्पग्रस्तांच्या भावनांशी खेळत त्यांना सोयीसुविधा देण्यास विसर पडला आहे. त्यात आणखीन कामगारांना देशोधडीला लावणारे खासगीकरणाचे वारे वाहू लागले आहेत. त्याला विरोध करून १९८४ च्या आंदोलनाची पुनरावृत्ती करून प्रकल्पग्रस्त कामगारांच्या घरांवर नांगर फिरवून जेएनपीटीचे खासगीकरण होऊ देणार नाही असा इशारा कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष कामगार नेते महेंद्र घरत यांनी दिला.

# विकेंद्रीकरणाच्या विकासवाटा

भौगोलिक आकार आणि विकासाला वाव, या दृष्टीने राज्यात आघाडीवर असलेल्या पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात आणखी दोन महापालिकांची स्थापना करण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेले सूतोवाच भविष्यातील विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. पुण्याच्या पूर्वेला हडपसर आणि पिंपरी-चिंचवडच्या लगत चाकण या परिसरात त्या दृष्टीने पायाभूत सुविधा विकसित करण्याचे आदेश त्यांनी 'पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणा'च्या (पीएमआरडीए) बैठकीत दिले आहेत. महानगरांलगत वाढणारी लोकसंख्या आणि त्यांच्यासाठीच्या सुविधा, हे व्यस्त गणित ग्रामपंचायती किंवा जिल्हा परिषदांच्या आवाक्याबाहेर जाते व अटळ ठरलेल्या शहरीकरणाबाबत वेळीच निर्णय घेणे आवश्यक ठरते. पुण्याच्या परिसरातील गावांनी हा सार्वत्रिक अनुभव या पूर्वी घेतला आणि पालिका हद्दीबाहेरील गावे सध्या घेत आहेत. ऐंशीच्या दशकात पिंपरी-चिंचवड परिसरातील गावांचा पुणे महापालिकेत समावेश करण्याचा मुद्दा पुढे आला. काही कारणांनी तसे न होता, पिंपरी-चिंचवडची स्वतंत्र महापालिका स्थापन झाली. हा निर्णय किती योग्य होता, हे काळाच्या ओघात स्पष्ट झाले. अल्पावधीतच ही महापालिका आशिया खंडातील श्रीमंत ठरली. धोरणकर्त्यांच्या द्रष्टेपणातून या भागात वेगाने झालेल्या औद्योगिकरणामुळे वाढलेल्या प्रचंड वस्तीस पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी महापालिकेचा निर्णय अनुकूल ठरला. त्या उलट पुणे महापालिकेच्या हद्दवाढीस विलंब झाला आणि त्यातून झालेल्या बजबजपुरीचे परिणाम तेथील जनता भोगत आहे. याच घटनाक्रमाची पुनरावृत्ती आता होते आहे. पुण्याच्या पूर्वेस हडपसर आणि परिसर वेगाने विकसित होत असून, नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून जवळ आहे. पिंपरी-चिंचवडच्या लगत असलेला चाकण-तळेगाव हा पट्टाही नव्या औद्योगिक विकासाचे केंद्र बनू लागला आहे. २३ गावांचा समावेश नुकताच झाल्यानंतर, पुणे ही राज्यातील सर्वांत मोठी महापालिका ठरल्याच्या पार्श्वभूमीवर विकेंद्रीकरणाचा विचार आवश्यक आहे; मात्र अशा विषयांमध्ये राजकारण आडवे येते. त्यामध्ये राजकीय गणिते असतात, वर्चस्वाचा-निवडणुकांचा मुद्दा असतो, त्याप्रमाणेच परस्परविरोधी हितसंबंधही असतात. मग स्थानिक अस्मिता उभ्या राहतात आणि 'एक इंचही जमीन देणार नाही,' यासारखी भाषा सुरू होते. वास्तविक महापालिकेच्या स्थापनेनंतर प्रामुख्याने नियोजनबद्ध विकास होतो. रस्ते, पाणी, सांडपाणी नियोजन असे प्रकल्प मार्गी लागतात. नागरिकांकडून करवसुली सुरू होते आणि त्यातूनच सुविधा पुरविल्या जातात; त्यामुळे योग्य तो कर भरण्याची मानसिकता अंगी बाणविण्याची नव्या काळात गरज बनली आहे. विकासाच्या प्रक्रियेत हे अपरिहार्य असले, तरी स्वतःची गती असलेले शहरीकरण कोणालाही रोखता येत नाही. त्याला एका मर्यादेच्या पलीकडे विरोध झाला, तर विकासाच्या गाडीला खीळ बसते. मुंबईच्या धर्तीवर 'पीएमआरडीए'ची स्थापना लांबली आणि मोठे विकासप्रकल्प कागदावरही येऊ शकले नाहीत. पुणे व पिंपरी-चिंचवडमधील मेट्रोही याच राजकारणाचा बळी ठरल्याने पुणेकरांचा श्वास वाहतुकीच्या कोंडीत अजूनही घुसमटतो आहे. तसाच पुणे महापालिकेत गावांच्या समावेशाचा राजकीय फुटबॉल झाला आणि येथील विकास दहा वर्षे मागे पडला. आता पुण्याची हद्दवाढ झाली असली, तरी महापालिकांची सध्याची स्थिती पाहता, इतक्या मोठ्या भूभागावर समाधानकारक सुविधा पुरविणे, हे निधी आणि मनुष्यबळाच्या मर्यादेमुळे अवघडच आहे. या पार्श्वभूमीवर पूर्व पुण्यासाठी स्वतंत्र महापालिकेचा विषय पुढे आला आहे. पुण्यात नव्या पालिकेच्या निर्मितीचा मुद्दा 'महाराष्ट्र टाइम्स'ने सातत्याने मांडला. देशातील अनेक महानगरांत प्रशासकीय व्यवस्थेसाठी एकाहून अधिक महापालिका आहेत. मुंबई आणि परिसरात विविध महापालिका आहेत; त्याप्रमाणेच दिल्लीतही चार महापालिका असून, बेंगळूरमध्ये विकेंद्रीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली आहे. या महानगरांच्या धर्तीवर पुणे व पिंपरी-चिंचवडच्या भागात आणखी महापालिकांची स्थापना आज ना उद्या काळाची गरज ठरणार आहे. शिक्षण आणि रोजगाराच्या निमित्ताने स्थलांतरितांची संख्या सर्वाधिक वेगाने वाढत असलेल्या शहरांत पुणे, पिंपरी-चिंचवड आघाडीवर आहेत. आर्थिक विकासाचे केंद्र बनलेल्या शहरांबाबत कोणतेही राजकारण किंवा विलंब आता परवडणारा नाही. नव्या महापालिकांच्या स्थापनेचा विषय कागदावर न राहता, प्रशासकीय पातळीवर त्याला गती देणे आवश्यक असून, जनतेची मानसिकता घडविण्याची मोठी जबाबदारी आहे. ७२ आणि ७३व्या घटनादुरुस्तीने हेच विकेंद्रीकरणाचे तत्त्व मांडले असून, स्थानिक स्वराज्य संस्था बळकटीकरणाची दिशा दाखविली आहे. अनेक मर्यादांमुळे महापालिकांसारख्या संस्था अद्यापही सक्षम आणि स्वयंपूर्ण झालेल्या नाहीत. हल्ली तर पक्षीय राजकारण आणि वरिष्ठांचा अवाजवी हस्तक्षेप, यांतून पुन्हा केंद्रीकरणाचे सुरू झालेले वारे हे विकासच नव्हे; तर लोकशाहीलाही मारक आहेत.

# द्रोणागिरी नोड सीआरझेडच्या विळख्यात ; भविष्यात कारवाईचे संकेत

**दै.रायगड नगरी । उरण**



सिडकोच्या माध्यमातून द्रोणागिरी नोडची निर्मिती झाली आहे. परंतु सदर नोड हा समुद्र किनारी असल्याने त्याठिकाणी सीआरझेड कायदा लागू करण्यात आला असल्याचे अधिकृत सूत्राकडून समजते. त्यामुळे सीआरझेड बाधीत जागेवर बांधकाम करण्यास बंदी असतानाही द्रोणागिरी नोडमध्ये बिल्डर लॉबी कडून इमारती उभ्या करण्याचा सपाटा लावला आहे. त्यावर भविष्यात कधी कारवाई होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत बिल्डर जबाबदारीतून मोकळा श्वास घेईल.

शासनाने समुद्र किनाऱ्या पासून काही अंतरावर सीआरझेडचा कायदा लागू केला आहे. त्या कायद्या अंतर्गत बांधकाम करण्यास परवानगी नसते. मात्र सिडकोने द्रोणागिरी नोड हे पूर्णपणे समुद्र किनारी वसविले आहे. त्यामुळे त्या ठिकाणी सीआरझेड कायदा लागू करण्यात आल्याचे अधिकृत सूत्राकडून समजते. या ठिकाणी ही बांधकाम करण्यास परवानगी नसतानाही बिल्डर लॉबी कडून इमारती उभ्या करून ग्राहकांच्या माथी मारण्याचा प्रयत्न सुरू आहे.

द्रोणागिरी नोडमध्ये सीआरझेड कायदा लागू केल्याने बिल्डर लॉबीचे धाबे दणाणले आहेत. परंतु त्यांचे हात दगडाखाली असल्याने ते येनकेन प्रकारे ग्राहकांना आकर्षित करून त्यांच्या माथी मारून विक्री करण्याचा प्रयत्न बिल्डरांच्या कार्यालयातील बोलबच्चन माणसांकडून सुरू आहे. एकदा गाहक भुलला की तो फसला म्हणून समजा. कारण कोणताही बिल्डर आपला नेहमीच चांगुलपणा सांगेल मात्र त्यातील त्रुटी काय आहेत हे सांगणार नाही.


द्रोणागिरी नोडमध्ये बिल्डर लॉबिंच्या आमिषाला बळी पडण्याआधी आपण घेत असलेल्या जागेचा सर्व्हे नंबर नक्कीच तोच आहे का दुसरा नाही ना? इथपासून ते सर्व कागदपत्रे खरी व नियमाला धरून काम होते की नाही याची पूर्णपणे खातरजमा करूनच आपला मेहनतीचा पैसा खर्ची लावा.

कारण सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या बिल्डर लॉबिंच्या इमारतींवर भविष्यात कारवाई होणार असल्याचे संकेत अधिकृत सूत्राकडून समजते. यामुळे बिल्डर लॉबिंचे धाबे दणाणले आहेत.

### महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानातील

# गावांच्या विकासकामांचा डॉ.किरण पाटील यांनी घेतला आढावा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानातील समाविष्ट २२ ग्रामपंचायतीच्या विकासकामाची आढावा बैठक काल (दि.३० ऑगस्ट २०२१) रोजी जिल्हा परिषदेतील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात घेण्यात आली.

या बैठकीस जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, महाराष्ट्र सामाजिक ग्रामपरिवर्तन अभियानाचे जिल्हा कार्यकारी अधिकारी रत्नशेखर गजभिये, तालुका समन्वयक धनंजय पाटील, दत्तात्रय गायकवाड,अवधूत पाटील व श्रीराम पन्हाळकर उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानातील समाविष्ट गावांच्या विकासकामे तसेच प्रलंबित कामांबद्दल माहिती घेण्यात आली. तसेच पुढील काळात इतर विभागांच्या सहकार्याने गावातील सामाजिक विकास करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थित महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन चे जिल्हा कार्यकारी अधिकारी रत्नशेखर गजभिये व तालुका समन्वयक यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पाटील यांना तालुक्यातील गावातील उद्दिष्टांबद्दल सविस्तर माहिती दिली.

या बैठकीत मनरेगामधील कामांचा महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तनमध्ये समाविष्ट असलेल्या गावांसाठी प्राधान्याने उपयोग, अभियानातील गावांतील लोकांचे १००% कोविड लसीकरण,स्वदेशच्या माध्यमातून आधी निवडलेल्या गावांव्यतिरिक्त इतर गावांचा समावेश व तळागाळातील लोकांनाही या अभियानाचा लाभ, या अभियानांतर्गत उपजीविका साधने व उदरनिर्वाह होण्याकरिता महिला आर्थिक विकास महामंडळ तसेच मनरेगाच्या माध्यमातून सहकार्य, महसूल विभागाच्या ई-पीक पेरा योजनेबाबत अभियानातील गावांमध्ये प्रबोधन करून मोहीम यशस्वी करणे,माझं गाव सुंदर गाव ही योजना यशस्वी करणे, महिला सक्षमीकरण, बचतगट निर्मिती, गटविकास अधिकाऱ्यांच्या समन्वयातून समृद्धी बजेट बनविणे आदि विषयासंदर्भात सविस्तर चर्चा झाली.

या बैठकीच्या निमित्ताने मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी अभियानातील सर्व गावांमध्ये मनरेगा अंतर्गत श्रमदान, १५ वा वित्त आयोग, सीएसआर फंड व सामाजिक संस्थांच्या मदतीने लोकांना लाभ मिळावा,याकरिता कामे करण्यासंदर्भात बहुमोल मार्गदर्शन केले तसेच विविध विभागांतर्गत प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, अशा सूचना केल्या. शेवटी श्री.रत्नशेखर गजभिये यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# उरण-करंजा रस्त्याची गणेशोत्सवापूर्वी दुरुस्ती करण्यासाठी सिडकोकडे मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण ते करंजा रस्त्याची अतिवृष्टीमुळे दुरावस्था झाली आहे. त्यामुळे गणेशोत्सवापूर्वी या रस्त्याची दुरुस्ती करावी अशा मागणीच्या आशयाचे निवेदन उरणचे माजी आमदार मनोहर भोईर यांनी सिडको प्रशासनाकडे केली आहे.यंदा मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे या रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून,मोठमोठे खड्डे या रस्त्यावर निर्माण झाले असून ठिकठिकाणी पावसाचे पाणी साचले आहे.

त्यामुळे येणाऱ्या सणासुदीचे दिवस येऊ घातल्याने सदर नादुरुस्त व खराब झालेल्या रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करावी व पावसाळ्यानंतर संपूर्ण रस्ता पूर्ण करावा, अशी मागणी उपतालुका संघटक तथा चाणजे ग्रामपंचायतीचे सदस्य अमित भगत, चाणजे सरपंच मंगेश थळी, व ग्रा.प. सदस्य व्यंकटेश म्हात्रे यांनी माजी आमदार मनोहर भोईर यांच्याकडे केली होती. त्यावर माजी अमादार मनोहर भोईर यांनी सिडकोचे तात्काळ सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय मुखर्जी यांना एका निवेदनाद्वारे या उरण - करंजा रस्त्या याबाबत ताबडतोब कार्यवाही करावी अशी मागणी केली आहे.



# प्रदीर्घ सेवे नंतर पांडुरंग कुलकर्णी सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यरत असणारे लिपिक पांडुरंग दगडू कुलकर्णी हे २९ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीचा निरोप व हार्दिक शुभेच्छा कार्यक्रम कळंबोली मध्ये विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी त्यांच्या भावी आयुष्यासाठी व निवृत्तीचे आयुष्य आनंदमय जीवन जाण्यासाठी विद्यालयातील कर्मचारी वर्गाने हार्दिक शुभेच्छा दिल्या यावेळी भावनिक वा-तावरण निर्माण झाले होते.

कळंबोलीतील सुधागड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत असणारे लिपिक पांडुरंग कुलकर्णी हे वयाच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. कार्य कुशल व कार्यतत्पर असणारे, नेहमी हसत मुखाने सर्वांना आपलेसे करून विद्यार्थी, पालक, शिक्षक वर्गांना प्रेमाणे सहकार्य करणारे पांडुरंग कुलकर्णी यांनी शैक्षणिक जगतात आपली नाळ चांगली जोडली होती. सर्वांना तत्परतेने सहकार्य व मार्गदर्शन करण्यात ते नेहमी पुढाकार घेत असत.

३१ ऑगस्ट रोजी ते आपल्या सेवेतून निवृत्त झाल्याने विद्या संकुल यांच्या वतीने विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा समाप्ती निरोप व हार्दिक शुभेच्छा यांचा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी त्यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन भावी आयुष्यासाठी शुभकामना देण्यात आल्या.

यावेळी बोलताना पांडुरंग कुलकर्णी म्हणाले की विद्यालयात कार्यरत असताना सर्वच शिक्षक, प्राचार्य व सहकारी वर्गाने मला खूप प्रेम व आपुलकी दिली असून त्यांनी दिलेल्या प्रेमाच्या शिदोरीच्या जोरावर मी माझे पुढील आयुष्य आनंदमय जगणार असून आपल्या सर्वांच्या शुभेच्छा या मला कायम प्रेरणादायी असणार आहेत. यावेळी विद्यालयाचे अधीक्षक दत्ता शिंदे, वरिष्ठ लिपिक बिना कडू, सीमा म्हात्रे, पर्यवेक्षक सरोज पाटील, ज्योती म्हात्रे, जाकिया मुल्ला, तसेच विविध विभागाचे प्रमुख शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## मंदिरं उघडली गेलीच पाहिजेत, नाहीतर घंटानाद करू : राज ठाकरे

असं राज ठाकरे म्हणाले.

मंदिरांच्या मुद्द्यावरूनही राज ठाकरे यांनी सरकारला सुनावलं. 'मंदिरं उघडली गेलीच पाहिजेत. आजचा दिवस जाऊ द्या. नंतर मी माझ्या सर्व कार्यकर्त्यांची बैठका घेणार आहे. त्यात आम्ही याबाबत चर्चा करूच. सगळी मंदिरं उघडलीच पाहिजेत नाहीतर सगळ्या मंदिरांच्या बाहेर घंटानाद करू,' असा इशाराच त्यांनी दिला. घराबाहेर पडायला ह्या लोकांची फाटते, त्यात आमचा काय दोष?,' असा सवालही राज यांनी केला.

## पुढच्या २४ तासात मुसळधार पावसाची शक्यता ; हवामान खात्याचा इशारा

झाल्यामुळे याचा परिणाम विविध राज्यात होणार आहे.

बुलढाणा, अकोला, वाशिम, उस्मानाबाद, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड, यवतमाळ, अमरावती, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, भंडारा, गोंदिया आणि कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात हवामान खात्याकडून करण्यात येलो अलर्ट जारी केला आहे. यामुळे या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस कोसळणार असून अकोल्यात आजही पावसाने जोरदार हजेरी लावली आहे.

कोकणात रत्नागिरी येथे रविवारपासून मंगळवारपर्यंत काही ठिकाणी पावसाचा जोर वाढलेला जाणवेल. ठाणे, रायगड येथे मंगळवारी ऑरेंज ॲलर्ट देण्यात आला आहे. पालघरमध्ये बुधवारी तुरळक ठिकाणी मुसळधार ते तीव्र मुसळधार स्वरूपाचा पाऊस पडेल. तर मुंबईमध्ये मंगळवारी आणि बुधवारी तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. रायगड, ठाणे येथे बुधवारीही तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडू शकेल.

# गणेशोत्सवापूर्वी कळंबोली वसाहत परिसरातील समस्या दूर करा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणेशोत्सवापूर्वी कळंबोली वसाहत परिसरातील खराब रस्ते, रस्त्यावरील बंद विजेचे दिवे आदींची तातडीने कामे करून घेण्याची शिवसेनेने सिडकोकडे मागणी केली आहे.

रायगड जिल्हा प्रमुख शिरीष घरत यांच्या आदेशाने,महानगर प्रमुख रामदास शेवाळे, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, यांच्या मार्गदर्शनाने शिवसेना कळंबोली शहर शाखेतर्फे सिडको ऑफिस कळंबोली येथे विविध नागरी समस्यांसाठी भेट देण्यात आली. कार्यकारी अभियंता बनकर यांचे निवेदन देऊन भेट घेतली, कळंबोळीतील मुख्य समस्यावर चर्चा करण्यात आली, मुख्यता खराब रस्ते, रस्त्यावरील विजेचे दिवे, इतर विषयांवर मार्ग लवकरात लवकर काढावे आणि कळंबोली जनतेला सर्व सुविधा चांगल्या मिळाव्यात असे निवेदन देण्यात आले.

सदर वेळी शिवसेनेचे, शहर प्रमुख डी एन मिश्रा,जेष्ठ शिवसैनिक माजी ग्राहक संरक्षण कक्ष रायगड अध्यक्ष,आत्माराम कदम,शहर समन्वयक गिरीश धुमाळ, उपशहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर, उपश-हर प्रमुख नारायण फडतरे, उपविभाग प्रमुख तुषार निढाळकर, विभाग प्रमुख महेश गुरव, आशुतोष शेंडगे, नागेश शेळके, विनय शिर्के, योगेश पगडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी सिडकोचे अधिकारी बनकर यांनीसुद्धा सकारात्मक प्रतिसाद देत लवकरात लवकर सिडकोमार्फत नागरी सुविधा चांगल्या प्रतीने उपलब्ध करून देऊ असे आश्वासन त्यांनी दिले आहे.

# शांतता कमिटी सदस्यांची बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीतील सर्व गणेशोत्सव मंडळ,महिला दक्षता समिती सदस्य व शांतता कमिटी सदस्यांची बैठक संपन्न झाली.

श्री कृपा हॉल सेक्टर ६ खांदा कॉलनी येथे सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल भागवत सोनवणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक खांदेश्वर पोलीस ठाणे देविदास सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीतील सर्व गणेशोत्सव मंडळ,महिला दक्षता समिती सदस्य व शांतता कमिटी सदस्य यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते ,सदर बैठक गणेशोत्सव सणाच्या अनुषंगाने योग्य त्या सूचना व परवानगीबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले,कोरोना महामारी मध्ये प्रशासनाने दिलेल्या आदेशाचे पालन होणे व गर्दी टाळावी ह्या साठी उपाय योजना करण्याबाबत व काही अडचणी असतील तर त्या सोडवण्यासाठी ह्या बैठकीचे आयोजन करण्यात आले व सविस्तर माहिती देऊन मास्क चे वाटप करून मिटींग ची सांगता करण्यात आली. समस्त गणेशोत्सव मंडळ,महिला दक्षता समिती सदस्या, शांतता कमिटी यांनी सहभाग घेऊन पूर्णपणे मदत कार्य चालू ठेऊ व पूर्ण सहकार्य करू याचे आश्वासन दिले.


## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविण्यात येत आहे की, जिल्हा : रायगड, तालुका : खालापूर पैकी गांव वडवळ येथील खालील वर्णनाची मिळकत सोलार शॉर्टब्लास्ट टेक्नॉलॉजीज तर्फे अपर्णा विवेक भट, निनु कौर महल, मोना महल चुघ व राज भवनसिंग महल यांचे सहमालकीची असून, सदर मिळकत विकत घेण्याबाबत मिळकतीचे सहमालकांबरोबर आमचे अशिलांनी बोलणी केली असून, प्राथमिक करार केला आहे.

| अनुक्रमांक | गट नंबर / हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार (रु.पै.) |
| --- | --- | --- | --- |
| १ | ७२ अ/१/अ/५३ | ०-२६-८० पैकी ०-२३-८० | - |
| २ | ७२ अ/१/अ/५४ | ०-२७-१० | - |

तरी, सदर मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर नांव असणाऱ्या सहमालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध या मिळकतीमध्ये असल्यास आणि वर नमूद केलेल्या जमिनीच्या प्रस्तावित व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांत नोंदवावी. त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि.३१/०८/२०२१

सही/-
ॲड.श्रीराम प्रमोद ठोसर
बी-४, लक्ष्मी व्हिला सोसायटी,
ब्राह्मण आळी, अलिबाग
अलिबाग, रायगड
मो.नं.९८२३२७९०४६


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## क्रेन मशिनमधून ५ बॅटऱ्यांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहतीतील गॅरेजमध्ये उभ्या करून ठेवलेल्या दोन हेअरिंग क्रेन मशीन मधील ४ बॅट्र्या व हायड्रा क्रेनमधील १ बॅटरी अशा एकूण ५ बॅट्र्यांची चोरी झाल्याची घटना घडली आहे.

अवतारसिंग केअरसिंग भट्टी (वय-६१) यांनी मास्टर लिफ्टर्स गॅरेजमध्ये या क्रेन ठेवल्या असता अज्ञात चोरट्यांनी त्यातील २१ हजारांच्या ५ बॅट्र्या चोरल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ज्येष्ठ नागरिक शामकांत नाईक बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उलवा नोड येथील ८० वर्षीय शामकांत तुकाराम नाईक हे नेहमीप्रमाणे २९ ऑगस्ट रोजी त्यांच्या मालकीच्या असलेल्या रॉकेल दुकानात गेले होते मात्र ते घरी परतले नाहीत. त्यामुळे ते हरवल्याची नोंद एनआरआय सागरी नवी मुंबई पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

शामकांत नाईक यांचा रंग सावळा, चेहरा गोल, अंगाने मध्यम, उंची ५ फूट ५ इंच असून त्यांनी अंगात राखाडी रंगाची सफारी प्रकारचे कपडे परिधान केले आहेत. त्यांच्याबद्दल कुणालाही माहिती मिळाल्यास एनआरआय सागरी पोलीस ठाणे किंवा शेखर नाईक ७६६६८९७७७७, मनोहर कडू ९१६७९९१३३७ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कुटुंबियांनी केले आहे.

## एसटीच्या नागोठणे स्थानकाचे वाहतूक नियंत्रक चंद्रकांत भोईर सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । वाकण**

राज्य परिवहन महामंडळाच्या रोहा आगारांतर्गत असलेल्या नागोठणे एसटी स्थानकाचे वाहतूक नियंत्रक व नागोठण्याजवळील कानसई गावातील मूळ रहिवासी असलेले चंद्रकांत भोईर हे ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर मंगळवार दि. ३१ ऑगस्टला सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने एसटीच्या नागोठणे स्थानकात त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच भविष्यातील त्यांच्या सेवानिवृत्त निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

नागोठणे एसटी स्थानकातील वाहतूक नियंत्रक कक्षात झालेल्या या छोटेखानी निरोप समारंभाला नागोठणे एसटी स्थानकाचे वाहतूक नियंत्रक भालचंद्र शेवाळे, एसटी चालक खेळू भोय, चालक कैलास पाटील, एसटी वाहक हेमंत कदम, वाहक गणेश मोकल, वाहक प्रसाद पाटील, वाहक योगिता पाटील, सोष्टे गुरुजी, नागोठणे एसटी स्थानकातील सफाई कामगार प्रणाली खैरे आदींसह प्रवासी यावेळी उपस्थित होते. चंद्रकांत भोईर यांनी एसटीचे वाहक म्हणून एसटीच्या कर्जत आगारात दोन वर्षे व रोहा आगारात २२ वर्षे अशी एकूण २४ वर्षे तर वाहतूक नियंत्रक म्हणून नागोठणे एसटी स्थानकात १० वर्षे सेवा केली आहे.

# वर्षाऋतुमधील निसर्ग सौंदर्य न्याहाळण्यासाठी पर्यटकांची माथेरानला पसंती

**दै.रायगड नगरी । माथेरान**



वर्षाऋतुमध्ये मुंबई पासून अगदी जवळ असलेल्या माथेरान सारख्या सुंदर पर्यटनस्थळाची भ्रमंती म्हणजे पर्यटकांना एक पर्वणीच असते. त्यामुळे पर्यटक आवर्जुन हजेरी लावत असतात. अन्य पर्यटन स्थळांच्या तुलनेत केवळ वाहतुकीची खर्चिक बाब वगळता अगदीच स्वस्त दरात राहण्याची सोय लॉजिगच्या माध्यमातून त्याचप्रमाणे हॉटेलमध्ये होत असते.

वर्षाऋतु मध्ये इथल्या नैसर्गिकरित्या साकारणाऱ्या अद्भूत निसर्गाच्या चमत्काराची सप्टेंबर महिन्यात खऱ्या अर्थाने अनुभुती पहावयास मिळते. बारा महिन्यांतील पवित्र समजला जाणाऱ्या श्रावण महिन्यात इथे निसर्ग निर्मितीचा अलौकिक आंनद आणि अधूनमधून पावसाच्या हलक्या सरी आणि श्रावण तापीच्या कोवळ्या उन्हात पॉईंट्स ची सैर करण्यात एक वेगळाच आनंद मिळतो. सप्टेंबर महिन्यात डोंगर रांगात सभोवताली आणि पॉईंट्स परिसरात सोनकीची पिवळी फुले आच्छादलेली असतात त्यामुळे भूमातेच्या गर्भातून सोन्याचा उदय झाला आहे की काय असा भास झाल्याशिवाय राहत नाही.

चोहोबाजूंनी गर्द झाडी आणि त्यातून पायी चालत जाण्याची मजा सुध्दा काही औरच असते. पावसाळी हवामानात गर्द धुक्यातून मार्गक्रमण करतांना अगदी समोरचं दृश्य दिसत नाही पॉईंट वरील हे दाट धुक्याचे निसर्गाचे आवरण मनाला मोहीत करते.शारलोट लेक वरील ओसंडून वाहणाऱ्या पाण्याखाली भिजण्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटक आतुर झालेले असतात. महत्त्वाचे जवळपास पंधरा पॉईंट्स असून इको पॉईंट, लुईझा पॉईंट, वन ट्री हिल, लिटिल चौक पॉईंट, सनसेट, रामबाग, हनिमून पॉईंट, मलंग पॉईंट असे काही महत्त्वाच्या स्थळांना भेटी दिल्यावर खरोखरच मनाला आलेली ग्लानी दूर होते निसर्गाच्या सानिध्यात वेळ कसा निघून जातो याचे भान रहात नाही. पावसात भिजल्यावर कुठल्या स्टॉल वर गरमागरम भजी चहाचा आस्वाद घेत तर कुठं निखार्यावर भाजलेला गरमागरम मका खाण्याचा मोह सुध्दा आवरता येत नाही. कुणी घोड्यावर तर आबालवृद्ध हातरीक्षाच्या साहाय्याने पॉईंट्स वरील नयनरम्य देखावे पाहण्यासाठी जात आहेत. एकंदरीत पूर्वीचे आणि आताचे वर्तमानातील माथेरान यात जमीन अस्मानाचा फरक प्रकर्षाने जाणवतो. तीन दशकांपूर्वी पावसाळ्यात इथले संपूर्ण व्यवहार बंद असायचे. हॉटेल्स आणि जुन्या बंगल्याना गवताच्या झडी लावून चार महिने या सर्व वास्तू बंदिस्त असायच्या परंतु इथे वर्षाऋतुमध्ये पर्यटकांची रेलचेल वाढू लागल्याने आता हे सुंदर स्थळ बाराही महिने पर्यटकांना सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सज्ज असते. पावसाळ्यात चार महिने माथेरानची मिनिट्रेन बंद असते त्यासाठी (दस्तुरी ) अमन लॉज स्टेशन पासून गावात येण्यासाठी मिनिट्रेनची शटल सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे इथे शनिवार आणि रविवार त्याचप्रमाणे अन्य सुट्टयांच्या हंगामात यात्रेचे स्वरूप प्राप्त होते. राहण्यासाठी लॉजिंग तसेच हॉटेल्स मोठया प्रमाणावर उपलब्ध असल्याने आगाऊ बुकिंग करण्याची सहसा आवश्यकता भासत नाही. अत्यंत स्वस्त दरात या सोयी इथे उपलब्ध आहेत. नेरळ स्टेशन वरून इथे येण्यासाठी चोवीस तास टॅक्सी सेवा उपलब्ध असते माथेरानचे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर उतरल्यावर पाच मिनिटांच्या अंतरावर अमन लॉज रेल्वे स्टेशन पासून माथेरान स्टेशन पर्यंत येण्यासाठी माफक दरात शटल सेवा सुरळीत सुरू आहे.

# रोहा तालुक्यातील विविध तलाठी कार्यालयांकरिता जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । वाकण**

तलाठी कार्यालय हे नागरिकांसाठी ग्रामीण स्तरावरील अत्यंत महत्त्वाचे कार्यालय मानले जाते. या कार्यालयातून जनतेची महसूलविषयक सर्व प्रकारची महत्त्वाची कामे केली जातात.

ग्रामीण भागातील जनतेची महसूलविषयक कामे सुलभ व्हावीत, प्रशासन गतिमान व्हावे तसेच येथील अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या व या कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांच्या दृष्टीने या तलाठी कार्यालयाची इमारत सुसज्ञ व अद्ययावत असणे, ही काळाची गरज होती. या दृष्टीने पालकमंत्री या नात्याने कु.आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष देण्यास सुरुवात केली होती.

या पार्श्वभूमीवर रोहा तालुक्यातील वेलशेत, तळाघर, ऐनघर, पळस, टेमघर, पाटणसई या तलाठी कार्यालयांच्या इमारतींच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी करण्यात आली होती. याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार तलाठी सजा वेलशेतसाठी क्षेत्र ०.०३०० हे.आर., तळाघर येथील तलाठी सजा तळाखारसाठी क्षेत्र ०.०३०० हे.आर., ऐनघरसाठी तलाठी सजा क्षेत्र ०.०३०० हे.आर., तलाठी सजा पळस साठी क्षेत्र ०.०३०० हे.आर., तलाठी सजा टेमघरसाठी क्षेत्र ०.०३०० हे.आर., तलाठी सजा पाटणसईसाठी क्षेत्र ०.०३०० हे.आर. ही जमीन महसूल मुक्त व सारा माफीने संबधित तलाठी कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने जारी केले आहेत.

यामुळे खऱ्या अर्थाने महसूल प्रशासन गतिमान होऊन जनतेला महसूल विषयक सोयी सुविधा सुलभतेने मिळतील. विविध प्रशासकीय कार्यालयांच्या नव्या इमारतीसाठी व अद्ययावतीकरणासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे करीत असलेल्या पाठपुराव्यामुळे प्रशासन निश्चितच गतिमान होण्यास मोठा हातभार लागणार आहे. रोहा तालुक्यातील तलाठी सजांना स्वतःची जागा मिळून ही कार्यालये लोकाभिमुख कामांसाठी उपयोगी ठरतील या भावनेने त्या त्या भागातील नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.


# मुरुड मध्ये एकशे तीस वर्षांची परंपरा लाभलेला श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा साधेपणाने

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड मध्ये एकशे तीस वर्षांची परंपरा लाभलेला पारंपारिक श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा खोत कुटुंबियांच्या निवासस्थानी यंदाही कोरोनाच्या सावटामुळे साधेपणाने साजरा करण्यात आला.

मुरुड मधील खोत कुटुंबियांच्या श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळ्याला १३० वर्षांची परंपरा असून मंगळवार दि.३१ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२-४० वा.श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा साजरा करण्यात आला.

सुरेश कुमार, पुरुषोत्तम श्रीकांत अविनाश खोत परिवाराने अत्यंत साधेपणाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ॲड.मृणाल खोत यांनी पोथी वाचन केले तर नामवंत भजनकार विद्याधर चोरघे यांनी सुश्राव्य बहारदार भजन सादर करण्यात येऊन पाळणा गीत सादर केले.यावेळी भाविकांना दही-पोहे गोडपीठ प्रसाद देण्यात आला.



# मोटारसायकलीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या सोसायटीच्या पार्किंगमध्ये उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरल्याची घटना तळोजा फेज-२ येथे घडली आहे.

राजकिशोर रामबली दास यांनी त्यांची १० हजारांची टिव्हिएस मोटारसायकल हि से.-१६ शुभ इनक्लीव्ह तळोजा फेज-२ येथे उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर मोटारसायकल चोरल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# डंपिंगमुळे पारगावकर त्रस्त; उपाययोजना करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोचे दुर्लक्ष कामामुळे ग्रुप ग्रामपंचायत पारगाव डम्पिंग ग्राउंडसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत प्रत्यक्षात पारगाव गेल्या अनेक वर्षापासून वंचित कचरा गोळा करून मोठ्या प्रमाणात कचऱ्याच्या ढीग जमा झाले आहेत त्यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने व सिडकोने तातडीने डम्पिंग ग्राउंड साठी जागा उपलब्ध करून द्यावा अशी मागणी सरपंच अहिल्या बाळाराम नाईक यांनी सिडकोसह रायगडच्या पालकमंत्री आदितीताई तटकरे यांच्याकडे केली आहे.

डंपिंग प्रश्नासंदर्भात अनेक वेळा पत्रव्यवहार करून सिडकोने तातडीने निश्चित करून देण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत सध्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर डंपिंगचा प्रश्न अत्यंत महत्त्वाच्या असून पारगाव ग्रामपंचायत अंतर्गत या भागातील लोकसंख्या ३५०० आहे. दररोज सुमारे टन भर कचरा गोळा केला जातो. सिडको याच्याकडे दुर्लक्ष करीत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पारगाव गावाच्या जमिनी नवी मुंबई अंतर विमानतळासाठी संपादित केले आहे. ५० टक्के जमिनी ग्रुप ग्रामपंचायत पारगाव हद्दीतील असून सिडको अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत शासनाकडे अनेक निवेदन देऊन त्याचा काही उपयोग होत नाही सदर व आपण जमिनी सिडको ला देऊन फार मोठी चूक केली आहे असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

Email :- mahad.ee@mahapwd.com Ph.No.02145 222167

**ई-निविदा सूचना क्रमांक ३८ सन २०२१-२०२२ (द्वितीय / तृतीय सूचना)**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| ई-निविदा क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत (रुपये) | निविदा अनामत रक्कम (रुपये) | ई-निविदा संचाची किंमत (रुपये) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मौजे इंदापूर तळाशेत येथे बहुउद्देशीय सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगाव, जिल्हा रायगड. (खासदार निधी) **(तृतीय सुचना)** | २२१८०६९/- | २३०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| २ | मौजे लिपणी वावे (शेख मोहल्ला) येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड (खासदार निधी) **(तृतीय सुचना)** | ४४४०७३/- | ५०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ३ | साई आदिवासीवाडी, येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका : माणगाव जिल्हा : रायगड. (खासदार निधी) **(तृतीय सुचना)** | ४४३५८१/- | ५०००/- | ५६०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| ४ | मांदाड, तळा, इंदापूर, पाचाड, महाड, करंजाडी लाटवण, विसापूर, दापोली रस्ता रा.मा.९७ आवश्यक ठिकाणी भूसंपादन करणे. तालुका महाड, जिल्हा : रायगड (५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च, ०३ राज्यमार्ग) **(द्वितीय सूचना)** | ६१८६६३५/- | ६२०००/- | ११२०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ५ | नाते मिरेकोंड रस्ता तयार करणे. तालुका : महाड, जिल्हा : रायगड (२५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रम सन २०२०-२१) **(द्वितीय सुचना)** | २९७९६०२/- | ३००००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ६ | दाभोळ मोहल्ला रस्ता तयार करणे. तालुका : महाड, जिल्हा रायगड. (२५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रम सन २०२०-२१) **(द्वितीय सुचना)** | २५६५४२९/- | २६०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७ | पोलादपूर देवपूर गोळेगणी कुडपण रस्ता प्र.जि.मा.७१ मधील कि.मी. २१/००० ते २४/००० मध्ये रस्त्याच्या बाजूस पक्के व आरसीसी गटारचे बांधकाम करणे. तालुका : पोलादपूर, जिल्हा : रायगड. (५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च, ०४ जिल्हा व इतर मार्ग) **(द्वितीय सूचना)** | २६६१३९१/- | २७०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ८ | विर येथे रस्ता तयार करणे. तालुका : महाड, जिल्हा : रायगड. (२५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रम सन २०२०-२१) **(द्वितीय सुचना)** | २३९३१३२/- | २४०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ९ | मोरसडे दिवाळीवाडी ते आडाचाकोंड येथे रस्ता तयार करणे. तालुका : पोलादपूर, जिल्हा : रायगड. (२५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रम सन २०२०-२१) **(द्वितीय सुचना)** | २३४१२४९/- | २४०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १० | म्हस्के कोंड येथे रस्ता तयार करणे. तालुका : महाड, जिल्हा : रायगड (२५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रम सन २०२०-२१) **(द्वितीय सुचना)** | २१३२१२२/- | २२०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक (द्वितीय सूचना)**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड करण्याचा व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक | दि.०१/०९/२०२१ (सकाळी १०.०० पासून) ते दि.१३/०९/२०२१ (१८.००) वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि.१५/०९/२०२१ वेळ ११.०० |

टिप :- परिपूर्ण निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील, सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२२७८**
दिनांक : **२५/०८/२०२१**

**सही/-**
**(आर.के.बामणे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**


# म्हसळा तालुक्यात सर्वत्र गोविंदा उत्साहात आणि आनंदात साजरा



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गेली दोन वर्षे कोराना च्या महामारीमुळे प्रत्येक सण अतिशय शांततेत आणि अत्यंत साध्या पद्धतीने साजरे करण्यात आले. सध्या कोरोनाची भीती थोडी धूसर झाल्याने बालगोविंदमध्ये उत्साहाचे वातावरण असून बालगोविंदांनी आपला आनंद थोड्याफार प्रमाणात द्विगुणित केला.

म्हसळा तालुक्यात सुमारे ७० गाव-वादिवस्तीवर गोविंदा खेळाला जातो. पैकी काही सर्री-वस्तीवर अजूनही लोकांमध्ये कोरोनाची भीतीमुळे गावमंडले मध्ये भीतीचे सावट आहे. म्हसळा शहरात मात्र काहीशी भीती दूर सारून गोविंदा पाठकांदवारे गोविंदा खेळाला. शहरात एकूण तीन गोविंदा पथके असून पेठकर समाजातर्फे आणि कुंभार समाज गोविंदा संपूर्ण शहरभर गोविंदा खेळतात तर सोनार -तांबट समाजाचा गोविंदा मात्र धावीर देव मंदिर ते पोलीस चौकी दरम्यान खेळवळा जातो. गोविंदा शांतपणे खेळला गेला आणि कोठेही अनुचित प्रकार घडला नाही.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, श्री.श्रीकृष्ण आदिनाथ गोसावी यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत आमच्या अशिलांना नोंदणीकृत खरेदीखतांद्वारे हस्तांतरीत करून देण्याचे मान्य केले असून सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची खात्री करून घेण्याकरिता सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

**मौजे : रोहिंजण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| भूमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|
| १०/१/अ/२/२ | २-८०-०० पैकी १-२०-०० |
| **(श्री.श्रीकृष्ण आदिनाथ गोसावी यांनी श्री.रामचंद्र सिताराम जाधव वगैरे यांच्याकडून विकत घेतलेल्या १-६०-०० हे.आर.पॉ. क्षेत्रापैकी ०-८०-०० हे.आर.पॉ. आणि श्री.रामचंद्र देवजी भातोसे वगैरे यांच्याकडून विकत घेतलेली ०-४०-०० हे.आार.पॉ.)** | |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदपत्र व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.३१/०८/२०२१

**सही/-**
**ॲड.प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट,**
**वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ,**
**अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल**
**दूरध्वनी क्र.२७४५६३०६**


# उरण येथे जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव साजरा



**दै.रायगड नगरी । उरण**

येथील प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय उरण सेंटर येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव साजरा करण्यात आला. प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयच्या प्रमुख राज योगिनी तारा दीदी यांच्या प्रेरणेने सदर कार्यक्रम साजरा करण्यात आला.

प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय उरणच्या प्रमुख ब्रहाकुमारी डिम्पल लक्ष्मण सेवक यांनी जन्माष्टमी चे आध्यत्मिक महत्व सांगितले. श्री कृष्णाची आरती करून दही हंडी फोडली सर्वांना प्रसाद वाटण्यात आला. त्याच प्रमाणे सर्वांनी रास गरबा सादर केला.

या प्रसंगी प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय उरणच्या प्रमुख ब्रहाकुमारी डिम्पल लक्ष्मण सेवक, भाग्यवंती माता, पिंकी बहेन, बी.के.मंजू, बीके सिता, बी.के. प्रियंका, पूनम वैष्णव, ज्ञानदिप तिवारी आदी उपस्थित होते . उरण शहरातील कामठा येथील श्री राधा कृष्ण मंदिरात आरती करून पाळणा घेण्यात आला. सर्वांनी दर्शन घेतले. नागरिकांनी आपल्या घरीच पूजा करून पाळणा गाऊन उत्सव साजरा केला.

# संक्षिप्त...

## अज्ञात वाहनाच्या धडकेने स्कूटी चालकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका अज्ञात वाहनाच्या धडकेने स्कूटीचालकाचा मृत्यु झाल्याची घटना मुंब्रा-पनवेल हायवे, नावडे गाव, मराठी शाळेच्या पुढील रस्त्यावर घडली आहे.

ब्रज किशोर चक्रवर्ती (वय-४४, रा.-नवीन पनवेल) हे त्यांच्या ताब्यातील स्कूटी घेऊन मुंब्रा-पनवेल हायवेने जात असताना नावडे गाव मराठी शाळेच्या पुढील रस्त्यावर आल्यावेळी कोणत्यातरी अज्ञात वाहनाने भरधाव वेगाने येऊन स्कूटीस कट मारून अपघात करून त्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यु झाला आहे. या अपघाताची नोंद तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## बस सेवा सुरू झाल्याने पंचक्रोशीतील नागरिक व विद्यार्थ्यांची गैरसोय थांबली

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोविड काळात बंद असलेली पाली-फणसवाडी एसटी बस पुन्हा सुरू करावी अशी मागणी नांदगाव विभाग मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी पेण व रामवाडी आगार प्रमुखांना निवेदनाद्वारे केली होती. या निवेदनाची दखल घेऊन ही बससेवा सुरू करण्यात आली आहे. परिणामी पंचक्रोशीतील नागरिक व विद्यार्थ्यांची गैरसोय थांबली आहे.

नांदगाव विभागातील एसटी बससेवा सुरू झाल्यामुळे नांदगाव पंचक्रोशीतील नागरिकांनी आनंद व्यक्त केले आहे. पाली-फणसवाडी एसटी बस दाखल झाल्यावर ग्रामस्थांनी बसचे वाहक व चालक यांचे स्वागत केले. तसेच पेण आणि रामवाडी आगार प्रमुखांचे आभार मानले. यावेळी नांदगाव विभाग मराठा समाजाचे अध्यक्ष बाळाजी सावंत, उपाध्यक्ष तुकाराम पडवळ, बाळकृष्ण धावडे, मनोज शिंदे, शांताराम लहाने, विशाल फाटे, भगवान बेलोसे, गोपीनाथ जाधव व सुनिल पालांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

### एसटीची ऑनलाईन आरक्षणाची गाडी सुसाट

# रायगड विभागात दहा वर्षांत २६ कोटींचे आरक्षण

**दै.रायगड नगरी । पेण**

खाजगी प्रवासी वाहतूकीचे आव्हान पेलून त्यांच्या बरोबर स्पर्धा करण्यासाठी तयार असलेल्या एसटी महामंडळाने आधुनिक युगात डिजिटल व माहिती आणि तंत्रज्ञानाची कास धरल्यामुळे एसटी महामंडळाच्या ऑनलाईन तिकीट आरक्षणाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. रायगड विभागात २०११ पासून सुरु झालेल्या या ऑनलाईन सेवेने २०20 पर्यंतच्या दहा वर्षांत २६ कोटी ४७ लाखांचे ऑनलाईन तिकीट बुकींग केल्याने आता एसटीचे ऑनलाईन तिकीट आरक्षणाची गाडी सुसाट धावत आहे.

देशातील सर्वात मोठे प्रवासी महामंडळ असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून प्रवाशांच्या सोयीसाठी आधुनिक काळानुसार तंत्रज्ञानाच्या वापरावर मोठ्या प्रमाणात भर दिला जात आहे. दहा वर्षांपूर्वी ऑनलाईन तिकीट बुकींग ला सुरुवात केल्या नंतर चार वर्षांपूर्वी महामंडळाने प्रवाशांच्या सोयीसाठी एका क्लिकवर तिकिटांचे आरक्षण करता यावे यासाठी 'एमएसआरटीसी' मोबाइल रिझर्व्हेशन अँप सुरु केले आहे. या बरोबरच एसटी महामंडळाच्या वेबसाईटवरून सुद्धा आरक्षण करू शकतात.

या ऑनलाईन आरक्षणाला सुरुवातीला पाहिजे तेवढा प्रतिसाद नव्हता. मात्र गेल्या पाच वर्षात एसटीच्या ऑनलाइन तिकीट आरक्षणाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

### असे करावे ऑनलाईन बुकींग

एसटी महामंडळाची तिकीट आरक्षणासाठी तीन प्रकारची सुविधा आहे. ज्यात तिकीट खिडकी आरक्षण, मोबाईल अँप आणि वेब साईटच्या माध्यमातून तिकीट आरक्षण करता येते.

### कोरोनाचा ऑनलाइन बुकींगला देखील फटका

कोरोना काळात एसटी ची सेवा जवळपास पूर्णपणे ठप्प होती. या काळात एसटी च्या ऑनलाईन आरक्षणाला देखील फटका बसला. कोरोना काळात रायगड विभागाला फक्त २० लाख ८८ हजारांचे ऑनलाईन आरक्षण मिळाले.



### तिकीट आरक्षणसाठी मोबाईल अँपला पसंती

खासगी प्रवासी वाहनांच्या बुकिंगसाठी गेल्या अनेक वर्षापासून मोबाईल अँप्लीकेशन उपलब्ध आहेत. त्यामुळे प्रवाशांचा या सेवेला अधिक पसंती आहे. त्यातच खासगी प्रवासी बसही अत्याधुनिक व आरामदायी स्वरूपाच्या असल्याने एसटीकडे प्रवाशांचे दूर्लक्ष होत असल्याचे चित्र होते. मात्र एसटीने सुद्धा खासगी वाहतूकीला टक्कर देण्यासाठी अनेक उपक्रम राबिविले आहेत. अत्याधुनिक शिवनेरी बस, इंटरनेटद्वारे तिकिट बुकिंग आणि आता मोबाईल अँप्स द्वारे बुकिंगची सुविधा उपलब्ध करून देऊन एसटीने डिजिटल क्षेत्राकडे पाऊल टाकले आहे. याला प्रतिसाद सुद्धा प्रवाशांना कडून मिळत आहे.

ऑनलाईन तिकीट आरक्षणाला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. ऑनलाईन बुकींग मुळे प्रवाशांचा वेळ वाचत आहे. गाडीत बसण्याची जागा निश्चित झाल्याने प्रवासात कोणताही त्रास होत नाही.

**- अनघा बारटक्के, विभाग नियंत्रक, रायगड**

### एसटीच्या रायगड विभागाची दहा वर्षात झालेले ऑनलाईन बुकींग

| | |
|---|---|
| २०११ | रक्कम ५२,00,८८0 |
| २०१२ | रक्कम ९५,३४,0३३ |
| २०१३ | रक्कम १,२३,६७,२८१ |
| २०१४ | रक्कम १,५३,२५,४२0 |
| २०१५ | रक्कम १,९५,६३,४२0 |
| २०१६ | रक्कम २,४0,४२,१७१ |
| २०१७ | रक्कम ३,२५,४0,६0१ |
| २०१८ | रक्कम ५,८१,४२,८0२ |
| २०१९ | रक्कम ६,७१,३३,१४६ |
| २०२० | रक्कम २0,८८,0२४९ |
| | एकूण २६,४७,३0,00३ |

### कल्पिता पिंपळे यांच्यावरील भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ

# उरण नगरपरिषद कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

**दै.रायगड नगरी । उरण**

ठाणे महानगर पालिकेच्या सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंपळे व त्यांचा अंगरक्षक सोमनाथ पालवे यांच्यावर कार्तव्याची अंमलबजावणी करीत असतांना ३० ऑगस्ट २०२१ रोजी झालेल्या भ्याड हल्लूयाच्या निषेधार्थ उरण नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी युनियनच्या वतीने एकदिवसीय कामबंद आंदोलन केले.




ठाणे महानगर पालिकेच्या सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यासह त्यांचा अंगरक्षक सोमनाथ पालवे हे ३० ऑगस्ट २०२१ राजी सायंकाळी ५ : ३० वाजताचे सुमारास ठाणे शहरात अतिक्रमण विरोधी पथक घेऊन बेकायदेशीर हातगाड्यांवर कारवाई करत असतांना गुन्हेगारी प्रवृत्तीचे हातगाडी फेरीवाले अमरजित यादव यांनी सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केला. या हल्लूयात त्यांची तीन बोटे कापली आहेत.तर शोमनाथ पालवे यांच्या हाताचे एक बोट कापले आहे. हा गुन्हेगारीचा फारच गंभीर प्रकार आहे.एका अधिकाऱ्यावर जीवघेणा हल्ला करणे ही बाब निश्चितपणे चिंताजनक आहे.त्यामुळे उरण नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचे कामबंद आंदोलन करून या बाबीचा सर्वच स्तरातून जाहीर निषेध करण्यात आला. या भ्याड हल्ला करणाऱ्या इसमावर जलदगती न्यायालयासमोर सुनावणी होऊन या इसमास कडक शिक्षा व्हावी अशा मागणीचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना रायगडचे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पाठवण्यात आले असून,त्या निवेदनाची प्रत उरण नगर परिषदेच्या अध्यक्षा व मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले असल्याचे म्युनिसिपल एप्लॉईज युनियनचे अध्यक्ष रमेश कांबळे,कार्याध्यक्ष संतोष पवार व सचिव नरेंद्र उभारे यांनी सांगितले.

## तळोजा येथे सोन्याची चेन चोरण्याचा असफल प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका सोन्याच्या दूकानातील सोन्याची चेन विकत घेणे आहे. डिझाईन दाखवा असा बहाणा करून सोन्याची चेन लबाडीच्या इराद्याने चोरण्याचा प्रयत्न असफल ठरला आहे.

कैलासचंद्र सोनी (वय-६१) यांचे श्रीनाथ ज्वेलर्स से.-१० तळोजा फेज-१ येथे दूकान असून त्याठिकाणी दोन इसम सोन्याची चेन विकत घेणे आहे.

डिझाईन दाखवा असा बहाणा करून दूकानात आले व त्यांनी सोन्याची चेन लबाडीच्या इराद्याने चोरण्याचा प्रयत्न केला.

परंतु त्यांचा प्रयत्व असफल झाला असून याबाबतची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली.

## कायद्याचे उल्लंघन कोणालाही नकोय पण किती दिवस सणांना रोखणार!

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

आज गोविंदोत्सव बालगोपालांच्या आनंदाला उधाण येते आणि यावर कायद्याचे बंधन अशी विचीत्रावस्था सद्या सर्वत्रच अनुभवली जात आहे. सतत दडपण तणाव जराही मोकळेपणाचा लवलेश नाही अशातच येणारे सण कसे साजरे करणार असा सवाल ऐरणीवर आहे.

आज माणगांव उतेखोलगांवची बालगोपालांनी फोडली दोन थरांची दहीहंडी. गावात दोन गोविंदापथक आहेत. गेले दोन वर्षापासून कोरोनाचे संकट काही केल्या पाठ सोडत नाही आणि बंद असलेला गोविंदोत्सव यामुळे लोकांना समाधानाने या सणांचा आनंद घेता आलेला नाही.

सर्वच लोकांच्या मानसिकतेवर त्याचे विपरित परिणाम जाणवत आहेत. तसेच पोलीस यंत्रणेवर त्याचा मोठा तणाव आहे. लोक सण साजरा करतानाही दबावा खाली दिसुन येत आहेत. याचा अर्थ कायद्याचे उल्लंघन कोणालाही करावेसे वाटत नाही परंतु किती दिवस असे भितीच्या वातावरणात रा-हणार असा सवाल जनते मधुन आता व्यक्त होत आहे. राज्यकर्त्यांनी आता याचा नक्कीच विचार करावा अशी वेळ मात्र नक्कीच आली असल्याची तिव्र जनभावना आहे.



## मजगांवमध्ये गोविंदा साधेपणाने



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील मजगांव मध्ये गोळ्ळाष्टमी व गोविंदा साधेपणाने साजरा करण्यात आला. यंदाही या सणावर कोरोनाचे सावट दिसून येत होते. शासनाच्या अटि, शर्ती व नियमांचे पालन करण्यात येऊन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

गोविंदा आला रे आला वाजत-गाजत आनंदोत्सवात निघणारी मिरवणूक मागील वर्षी व यंदाही कोरोनाच्या सावटामुळे दहीहंडी उत्सव गोविंदांनी अत्यंत साधेपणाने साजरा केला. दर्यापूत्र मित्र मंडळ उपाध्यक्ष जयवंत बुल्लू, चौकीपाडा अध्यक्ष प्रदीप पाटील, रुपेश गोयजी, यांसह बाळगोपाळ सहभागी झाले होते.

### विविध गुह्यात हस्तगत करण्यात आलेला

## १ कोटींचा मुद्देमाल पोलिसांनी फिर्यादींना केला परत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलिसांनी विविध गुह्यांचा छडा लावून परत मिळविलेला सुमारे १ कोटी रुपये किंमतीचा मुद्देमाल वाशी येथील साहित्य मंदिर सभागृहात आयोजित विशेष कार्यक्रमात ४१ फिर्यादींना परत करण्यात आला. यावेळी पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह, अप्पर पोलीस आयुक्त महेश धुर्ये, परिमंडळ-१ चे पोलिस उपायुक्त सुरेश मेंगडे, सहाय्यक पोलिस आयुक्त विनायक वस्त, भरत गाडे तसेच परिमंडळ-१ मधील सर्व पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक व इतर अधिकारी उपस्थित होते.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-१ अंतर्गत असलेल्या १० पोलिस ठाण्यात मागील वर्षात दाखल असलेल्या विविध गुह्यांचा पोलिसांनी उत्कृष्टरित्या तपास करुन चोरीस गेलेला व फसवणुक केलेली मालमत्ता हस्तगत केली आहे. गत वर्षभरामध्ये परिमंडळ-१ मधील विविध पोलीस ठाण्याकडुन सुमारे १ कोटी रुपये किंमतीचा मुद्देमाल परत मिळविला आहे. हाच मुद्देमाल फिर्यादींना परत करण्यासाठी सोमवारी वाशीतील साहित्य मंदिर सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलिस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांच्या हस्ते ४१ फिर्यादिंना त्यांचा मुद्देमाल परत करण्यात आला. या कार्यक्रमात सोने चांदीचे दागिने, रोख रक्कम, मोटार वाहने व इतर वस्तु फिर्यादिंना परत करण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने चेन स्नॅचिंग, घरफोडी, चोरी तसेच फसवणूक या सारख्या गुह्यांचा समावेश आहे. यावेळी फिर्यादींना त्यांच्या मौल्यवान वस्तू परत मिळाल्याने त्यांनी पोलिसांचे आभार मानुन समाधान व्यक्त केले.



# करंजा गावात बंदी असलेल्या बायोडिझेलची खुलेआम विक्री

### मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांच्या आदेशाला केराची टोपली

**दै.रायगड नगरी । उरण**

पेट्रोल डिझेलचे भाव गगनाला भिडले असताना उरण करंजा गावात मच्छीमार बोटींना बंदी असलेल्या बायो डिझेलची खुलेआम स्वस्त दरात विक्री सुरू आहे. काही महिन्यांपूर्वी करंजा गावात अशा प्रकारे बायो डिझेलची विक्री करणाऱ्यांवर नवी मुंबई पोलिसांनी कारवाई केली होती. मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांनी बायो डिझेलची विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश प्रशासनाला देऊनही करंजा गावात दररोज ३ टँकर बायो डिझेलची विक्री होत असल्याची माहिती एका मच्छिमार नाखवांनी दिली. मग आता त्यांच्यावर कारवाई का होत नाही. यामध्ये प्रशासन व बायो डिझेलची विक्री करणारे यांचे आर्थिक लागेबांधे असल्याची चर्चा करंजा परिसरात सुरू आहे.

पेट्रोल डिझेलचे दर शंभरीच्या आसपास पोहचले असल्याने कमी दरात मिळणाऱ्या बायो डिझेलची विक्री करणारी टोळी उरण परिसरात कार्यरत आहे. काही महिन्यांपूर्वी करंजा गावातील मच्छीमार बोटींना स्वस्त दरात बायो डिझेलची विक्री सुरू होती. या विक्री करणाऱ्यांवर नवी मुंबई पोलिसांनी धाड टाकत ४ टँकर पकडून गुन्हा दाखल केला होता.

परंतु करंजा गावात गेली अनेक दिवसांपासून टँकर द्वारे मच्छीमार बोटींना बायो डिझेलची विक्री नारायणाच्या कृपेने गेली अनेक दिवसांपासून सुरू आहे. बाजारभाव डिझेलचा दर हा लिटरमागे ९० ते ९५ रुपये इतका असताना बायो डिझेल लिटर मागे ६७ रुपयांनी विक्री सुरू आहे. लिटर मागे १५ ते २० रुपये वाचत असल्याने बायो डिझेलला मागणी मोठ्या प्रमाणात सुरू आहे. नवी मुंबई व उरण पोलिसांनी स्वस्त दरात बंदी असलेल्या



बायो डिझेलची विक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली असताना. आजच्या घडीला करंजा गावात नारायणाच्या राजकीय वरदहस्ताने गेली अनेक दिवसांपासून स्वस्त दरात बायो डिझेलची विक्री सुरू आहे. दिवसाला ३ टँकर बायो डिझेलची विक्री होत आहे. याची कोणालाच कशी माहिती नाही, याचे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सदर बायो डिझेलचे टँकर उभे करण्यासाठी मेरिटाईम बोर्डच्या जागेचा वापर केला जात आहे. त्यांच्या सेवेसाठी मेरिटाईम बोर्डचा गेट सताड उघडा ठेवला जात असल्याचे ग्रामस्थ सांगतात. मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांनी नुकतीच मुंबई येथे बैठक घेतली होती त्याठिकाणी संबंधित मत्स्यखात्याच्या अधिकारी वर्गाना बायो डिझेलची विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले असताना. मत्स्यविभागाचे अधिकारी डोळ्यावर गांधारीची पट्टी बांधून याकडे जाणूबुजून दुर्लक्ष करीत असल्याचे उघड होते. तरी मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांनी करंजा गावात नारायणाच्या कृपेने स्वस्त दरात बायो डिझेलची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे.

## नेरेपाडा गावाची हंडी फोडली बाळ गोपाळांनी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील नेरेपाडा गावाची एक हंडी, एक उत्साह दरवर्षी अनोख्या पद्धतीत पहावयास मिळतो. अनेक वर्षापासूनची परंपरा आजही येथे जपून ठेवली आहे. दरवर्षी प्रमाणे गावात जन्माष्टमी व दहिहंडी उत्सव साजरा करण्यात आला. कुणी गोविंद घ्या, कुणी गोपाळ घ्या आणि गोविंदा रे गोपाळा, यशोदाच्या तान्ह्या बाळा या गजरात श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव व दहिहंडी साजरा करण्यात आला. यावेळी बाळगोपाळांनी अतिशय आनंदात व उत्साहात हंडी फोडली. धोरणामुळे दहीहंडी न वर बंदी घालण्यात आली आहे मात्र अतिशय कमी जणांच्या संख्येत ही दहीहंडी पार पडली यावेळी वरुण राजाने दिवसभर जोरदार हजेरी लावली. ही दहीहंडी बाळगोपाळांनी फोडली. मुलांनी अनोखी दहिहंडी मुलांनी साजरी केली. यावेळी गावातील ग्रामस्थ, महिला, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.